**जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्राम पंचायतींच्या निवडणुकीमध्ये मतदान केंद्रांवरील मतदारांची संख्या ८०० च्या जवळपास ठेवण्याबाबत.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्र. रानिआ/जिपपंसनि/२०१०/प्र.क्र.०२/का-७,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- १२ जुलै, २०१०**

**आदेश**

जिल्हा परिषद व पंचायत समित्या तसेच ग्राम पंचायतींच्या निवडणुकीमध्ये आतापर्यंत प्रत्येक मतदान केंद्रांवरील मतदारांची संख्या साधारणपणे १००० ते १२०० या दरम्यान ठेवण्यात येत होती. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या तसेच ग्राम पंचायतींच्या निवडणुकीमध्ये ब-याचदा एकापेक्षा जास्त उमेदवारांना निवडून द्यावयाचे असते. त्यामुळे प्रत्येक मतदाराला मतदान करण्यास जास्त कालावधी लागतो. असेही आढळून आले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये ग्रामीण भागातील मतदार मोठ्या संख्येने मतदानात भाग घेत असल्यामुळे मतदानाची टक्केवारी जास्त असते. मतदानासाठी निश्चित करण्यात आलेली वेळ संपत आलेली असतानाही मतदान केंद्रांच्या बाहेर मतदारांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या असतात. त्यामुळे मतदानाच्या वेळेनंतरही उशिरापर्यंत मतदान चालू ठेवणे भाग पडते. असे प्रसंग टाळण्यासाठी मतदान केंद्रांना जोडलेल्या मतदारांची संख्या कमी करणे आवश्यक झाले आहे. सबब, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम ९ ए (४) व मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १० ए (४) अन्वये राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन असे आदेशित करण्यात येते की, जिल्हा परिषद व पंचायत समित्या तसेच ग्राम पंचायतींच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकीमध्ये मतदान केंद्रांवरील मतदारांची संख्या ८०० च्या जवळपास ठेवण्यात यावी. मतदान केंद्रांच्या निश्चितीबाबतचे निकष सोबतच्या परिशिष्टात नमूद करण्यात आले आहेत.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

(नि.ज.वागळे)
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग,

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)
सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
सर्व तहसिलदार (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)
मा.आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
प्रधान सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
राज्य निवडणूक आयोगातील सर्व उप सचिव / सहायक आयुक्त /अवर सचिव व सर्व कार्यासने
निवड नस्ती (कार्यासन-७)

D:\drb of ro handbk.doc/zp

## परिशिष्ट

## मतदान केंद्राच्या निश्चितीबाबतचे निकष

**मतदान केंद्रांची संख्या -**

**अ)** नागरी विभागात (महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषद क्षेत्रात) कमाल १००० मतदारांसाठी किमान १ मतदान केंद्र असावे.

**ब)** ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी (जिल्हापरिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींसाठी) कमाल ८०० मतदारांसाठी किमान १ या प्रमाणे मतदान केंद्र असावे.

**क)** ग्रामपंचायतींमध्ये अनेक वाड्या, वस्त्या समाविष्ठ असण्याची शक्यता असते त्यामुळे एखाद्या प्रभागात अशा काही वस्त्या, वाड्या किंवा एकापेक्षा अधिक गावे समाविष्ट असेल त्यावेळी अशा वाड्या, वस्त्यांवर २ मतदान केंद्र तयार करण्यात यावे. तसेच दुर्गम भागात आवश्यकतेप्रमाणे जास्त मतदान केंद्र निश्चित करण्यास हरकत नाही.

* मात्र प्रत्येक प्रभागासाठी / निवडणूक विभाग, निर्वाचक गणासाठी कमीत कमी १ मतदान केंद्र राहील.

* जोडलेली मतदार यादी विचारात घेऊन प्रत्येक मतदान केंद्राचे कार्यक्षेत्र निश्चित करावे.

* मतदान केंद्राचे स्थान निश्चित करताना त्याच मतदान केंद्रावर जोडलेले मतदार हे सलग क्षेत्रातील असणे अवश्यक आहे. त्याचप्रमाणे कोणत्याही मतदारास मतदान केंद्रावर पोहचण्यासाठी २ कि.मी. पेक्षा अधिक अंतर प्रवास करावा लागणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

* मतदान केंद्राला जोडलेले मतदार वरीलप्रमाणे संलग क्षेत्रातील असणे आवश्यक आहे. जोडलेल्या मतदारांच्या आधारावर मतदान केंद्रांचे स्थान निश्चित करण्यात यावे. अशाप्रकारे तयार करण्यात आलेल्या कार्यक्षेत्रात मतदान केंद्राची जागा निश्चित करणे आवश्यक आहे.

* मतदान केंद्र त्याच क्षेत्रात असावे.

* मतदान केंद्र शासकीय, निमशासकीय, अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारतीत असायला हवे.

* मतदान केंद्र पक्क्या इमारतीत असायला हवे. पावसाळयात अशा इमारतीमध्ये छपरातुन पाणी येणार नाही याची दक्षता घ्यावी.

* सुरक्षिततेच्यादृष्टीने व मतदारांच्या सोयीच्यादृष्टीने ही इमारत योग्य असायला हवी.

* इमारतीत पिण्याच्या पाण्याची, प्रसाधनगृहाची सोय असावी. शक्य असेल तोवर जाण्यायेण्यासाठी स्वतंत्र दरवाजे असणे आवश्यक आहे.

* वृध्द, गरोदर स्त्रिया, अपंग व्यक्ती यांना मतदान करतांना अडचण येऊ नये म्हणून मतदान केंद्र तळमजल्यावर ठेवावे व रॅम्पची व्यवस्था असणे आवश्यक आहे.

* मतदान केंद्र हवेशीर व नैसर्गिक प्रकाश असणारे असणे आवश्यक आहे.

* एकाच इमारतीत २ पेक्षा जास्त मतदान केंद्र असू नये.

* सर्वसाधारणपणे खाजगी इमारतीत मतदान केंद्राची निवड करु नये व अपवादात्मक परिस्थितीत असे करणे आवश्यक झाल्यास इमारतीच्या मालकाची संमती घेणे आवश्यक आहे. अशी व्यक्ती कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित असू नये.

* मतदान केंद्र कोणत्याही धार्मिक स्थळ, पोलीस स्टेशन अथवा रुग्णालयात असणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत जेथे कोणतीही सोयीस्कर इमारत उपलब्ध नसेल अशावेळी यथास्थिती महानगरपालिका निवडणुकांसाठी महानगरपालिका आयुक्त आणि इतर सर्व निवडणुकांसाठी जिल्हाधिकारी यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

* ज्या ठिकाणी मंडपात मतदान केंद्र असेल तेथे पावसाळ्याच्या दिवसात ताडपत्रीची व्यवस्था करण्यात यावी.

* मतदान केंद्राचे स्थान निर्देश व मार्गाचा नकाशा तयार करणे आवश्यक आहे.

* मतदान केंद्राची यादी तेथे जोडलेल्या मतदाराच्या यादीसह व मार्गाच्या नकाशासह जाहीर करण्यात यावी.

वरीलप्रमाणे मतदान केंद्र निश्चित केल्यानंतर व यादी प्रसिध्द झाल्यानंतर जर काही कारणास्तव अपवादात्मक परिस्थितीत मतदान केंद्राचे स्थान किंवा इमारतीमध्ये बदल करावयाचा असल्यास महानगरपालिकेच्या निवडणुकीबाबत महानगरपालिका आयुक्त व इतर निवडणुकांच्याबाबतीत जिल्हाधिकारी याची पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता राहील व तसे राज्य निवडणूक आयोगास अवगत करावे.

------------